महासागर

e-mail : nagpurpost@gmail.com ● mahasagarngp@gmail.com

# टक्कल व्हायरस बाधित बोंडगावात विशेष टिम दाखल

## जि.प. मुख्याधिकारी, शास्त्रज्ञ व अकोला, बुलढाणा मेडिकल कॉलेजच्या डॉक्टरांनी केली पाहणी

**शेगाव (महासागर प्रतिनिधी) -** तालुक्यातील बोंडगाव मध्ये टक्कल व्हायरसचा प्रादुर्भाव वाढल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. या परिस्थितीला गांभीर्याने घेत, जिल्हा परिषद मुख्याधिकारी यांच्या नेतृत्वाखाली एक विशेष टीम गावात पाहणी करून नागरिकांशी संवाद साधला. यामध्ये अकोला आणि बुलढाणा मेडिकल कॉलेज येथील डॉक्टर व तज्ज्ञांची टीम गावात पोहोचली असून, त्यांनी त्वरित आरोग्य तपासणी व उपचार सुरू केले आहेत.



शास्त्रज्ञांच्या टीमने व्हायरसचे मूळ, संक्रमणाचे स्वरूप, आणि प्रतिबंधात्मक उपाय यावर संशोधन सुरू केले आहे. महत्त्वाचे निर्णय व उपाययोजना सुरू करण्यात आल्या आहेत.

गावात तात्काळ वैद्यकीय शिबिरे सुरू करण्यात आली आहेत. बाधित क्षेत्रांमध्ये स्वच्छता मोहीम राबविण्यात आली आहे. नागरिकांना जागरूक करण्यासाठी विशेष मार्गदर्शन शिबिरे आयोजित केली जात आहेत. आरोग्य विभागाने प्रतिबंधात्मक औषध वाटप मोहिमेस सुरुवात केली आहे. टक्कल व्हायरसचा प्रादुर्भाव नियंत्रणात आणण्यासाठी प्रशासन, वैद्यकीय तज्ज्ञ, आणि स्थानिक नागरिक एकत्रितपणे काम करत आहेत. परिस्थितीवर लवकरच नियंत्रण मिळवले जाईल, असा प्रशासनाचा विश्वास आहे.

यावेळी जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाबराव खरात,जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. गीते ,अतिरिक्त जि .प.मुख्याधिकारी डी . एन. मोहन, गट विकास अधिकारी कनाटे , अतिरिक्त गट विकास अधिकारी आर. टी.सुरोषे साहेब, सी. एस.भुसारी साथरोग अधिकारी डॉ. सांगळे, तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ. बाहेकर मॅडम, डॉ. बंदकर , तहसीलदार बाजड साहेब, शिवसेना शेगाव तालुका तथा सरपंच संघटना अध्यक्ष शेगाव तालुका रामा पाटील थारकर, मा.जिल्हा परिषद उपाध्यक्ष संगीतराव भोंगळ, गट विकास अधिकारी, कानाटे, ग्रामसेवक बजोले होते.

### मुख्याधिकाऱ्यांची प्रतिक्रिया

**जिल्हा परिषद मुख्याधिकारी यांनी गावकऱ्यांना धीर देत सांगितले की, ''ही परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले जातील. आरोग्य सेवांची नियमित उपलब्धता आणि आवश्यक त्या सुविधा यासाठी प्रशासन कटिबद्ध आहे.''**

### बाधित गावांना टँकरने पाणीपुरवठा करा...

तालुक्यातील बाधित गावांना हा प्रकार नेमका कशामुळे होत आहेत याचा उलगडा होईपर्यंत आंघोळीसाठी टँकरने पाणीपुरवठा करावा तसेच बाधित गावातील प्रत्येक घरातील व्यक्तींना मल्टी विटामिन औषधांचा पुरवठा करावा अशी मागणी शिवसेना तालुकप्रमुख तथा तालुका सरपंच संघटनेचे अध्यक्ष तथा खातखेड बोंडगावचे सरपंच रामा पाटील थारकार यांनी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाबराव खरात यांचे कडे केली.

# जागेच्या वादातून पती – पत्नीवर प्राणघातक हल्ला

## पती गंभीर, तिघांविरोधात गुन्हे दाखल

नांदुरा (महासागर प्रतिनिधी) – जागेच्या कारणावरून झालेल्या वादातून पती पत्नीवर प्राणघातक हल्ला करण्यात आल्याची घटना तालुक्यातील माटोडा येथे ३ जानेवारी रोजी दुपारी ३ वाजता घडली होती . या घटनेत पती गंभीर जखमी झाल्याने त्याला तातडीने अकोला येथे उपचारासाठी दाखल करण्यात आले . याप्रकरणी पत्नीच्या फिर्यादीवरून नांदुरा पोलिसांनी तिघा आरोपींविरुद्ध कलम ११८(१) ,११५(२) , ३५२ , ३५१ (२)(३) , ३(५) भा.न्या.सं. अन्वये गुन्हे दाखल केले होते. दरम्यान जखमीच्या वैद्यकीय प्रमाणपत्रावरुन पोलिसांनी दाखल केलेल्या कलमांमध्ये गुरुवारी रात्री कलम १०९ (हत्येचा प्रयत्न करणे) चा समावेश केला आहे.

या बाबत प्राप्त माहितीनुसार, तालुक्यातील माटोडा येथील ज्ञानदेव खराटे व मधुकर खराटे या शेजारी राहणाऱ्या दोन कुटुंबात काही दिवसांपासून जागेवरून वाद सुरू आहेत. दिनांक ३ जानेवारी रोजी ज्ञानदेव खराटे हे त्यांच्या जागेत लाकडी खुट रोवत असतांना मधुकर खराटे यांनी त्यांना खुट रोवण्यास मनाई करुन शिवीगाळ केली. यावेळी ज्ञानदेव खराटे हे मधुकर खराटे यांना समजावून सांगत असतांना मधुकर खराटे यांची शिवाजी व श्रीराम ही दोन मुले शेतातून घरी परत आले आणि या तिघांनी संगनमत करून ज्ञानदेव खराटे व त्यांच्या पत्नी मालुबाई यांना लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. यावेळी शिवाजी खराटे याने लोखंडी पाईपने ज्ञानदेव खराटे यांच्यावर प्राणघातक हल्ला केला. या हल्ल्यात डोक्यात जबर मार लागल्याने ते गंभीर जखमी झाले. तसेच मधुकर खराटे यांनी पती पत्नीला लाथाबुक्क्यांनी मारहाण करून त्यांना जिवे मारण्याची धमकी दिली. या घटनेनंतर गावकऱ्यांनी गंभीर जखमी ज्ञानदेव खराटे यांना परस्पर अकोला येथील न्युरोसर्जन डॉ नरेंद्र भागवत यांच्या दवाखान्यात उपचारासाठी दाखल केले. या घटनेनंतर जखमी यांच्या पत्नी सौ. मालुबाई ज्ञानदेव खराटे वय ५० यांनी नांदुरा पोलिस ठाण्यात फिर्याद दाखल केली. त्यांच्या फीर्यादी वरुन नांदुरा पोलिसांनी आरोपी शिवाजी मधुकर खराटे वय ३६ , मधुकर जगन्नाथ खराटे वय ६५ व श्रीराम मधुकर खराटे वय ३४ या तिघांविरुद्ध कलम १०९ , ११८(१) , ११५(२) , ३५२ , ३५१(२) (३) ,३ (५) भारतीय न्याय संहीता अन्वये गुन्हे दाखल केले आहेत. या प्रकरणाचा तपास पीएसआय चंद्रकांत मोरे हे करीत आहेत.

# खामगाव कृउबास मध्ये शेतकरी व अडत्यामध्ये वाद

## अडत दुकानदाराचा परवाना रद्द करण्याचे निर्देश

**खामगाव (का.प्र.) -** खामगाव कृषी उत्पन्न बाजार समितीमधील परवानाधारक अडते हे गोरगरिब, सर्वसामान्य शेतकऱ्यांच्या मालातील मालाचे मोजमाप करतांना भरदिवसा शेतकऱ्यांच्या डोळ्यासमोर मापात पाप करीत असल्याची घटना समोर आली आहे. नव्हे तर मोजमाप करतांना एका क्विंटलमागे बारदान्यासकट आठ किलो जास्तीचा शेतमाल मोजून शेतकऱ्याची आर्थिक फसवणुक करीत असल्याचेही समोर आले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये तीव्र आक्रोश पाहावयास मिळाला. याबाबत खामगाव बाजार समिती संबंधित अडत्याविरुद्ध काय कारवाई करते याकडे लक्ष लागले आहे. संदर्भात सविस्तर असे की, बाबुराव वामन इंगळे रा. महाळुंगी ह.मु.भंडारी ता. खामगाव शेतकऱ्याने आज खामगाव बाजार समितीत शेतमाल विक्रीसाठी आणला होता. ४० क्विंटल शेतमालातील मोजणी सुरु झाली. सावता अडत दुकानाच्या अडत्याकडून शेतमालाची मोजणी सुरु असतांना ६ क्विंटल शेतमाल मोजणीदरम्यान क्विंटलच्या वजनासह ८ किलो अतिरिक्त वजन ठेवून जास्तीचा मालाची लूट होत असल्याची घटना संबंधित शेतकऱ्याच्या निर्देशनात आली. आणि त्याने आक्रोश करून बाजार समितीमधील सर्व शेतकरी गोळा केले. यावेळी बाजार समितीच्या संचालकांनी दखल घेत संबंधित अडते व शेतकऱ्याला कार्यालयात बोलावून घेतले. या प्रकरणी सभापती सुभाष पेसोडे यांनी त्वरीत दखल घेत निमकर्डे यांच्या सावता ट्रेडर्स अडत दुकानाचा परवाना रद्द करण्याचे निर्देश दिले आहेत.

# प्रवासी महिलेची ३० हजाराची पोथ लंपास

**नांदुरा (महासागर प्रतिनिधी)** - शहरातील पोलीस चौकी समोर असलेल्या बस स्टॉप वर एस.टी. बस क्र. एम एच ४० / ए क्यु ६२५० या खामगांव कडे जाणाऱ्या बस मध्ये चढणाऱ्या देवकाबाई रामकृष्ण रावरकर, रा. राजंदा जि.अकोला येथील वयोवृध्द महीलेच्या गळ्यातील ३० हजार रूपये किंमतीची पोथ अज्ञात भामट्याने पळविल्याची घटना गुरूवार ९ जानेवारी रोजी घडली आहे.

सदर बस नांदुरा शहराबाहेर निघताच त्या महीलेला आपल्या गळ्यातील पोथ नसल्याचे दिसताच ती महीला रडत होती. तिचे सोबत असलेले तिचे पती रामकृष्ण रावरकर यांनी तिला समजावले.

एस टी बसमधील सहप्रवाशांनी सदर जोडप्यास खामगांव पोलीस स्टेशन मध्ये तक्रार करण्याचा सल्ला दिला.

बस मधील महिला वाहकाने खामगाव येथील पो.स्टे जवळ बस थांबवून त्यांना उतरविले. दरम्यान खामगांव पोलीस स्टेशन चे तथाकथीत अधिकाऱ्यांनी तक्रार घेण्यास नकार देऊन तुम्ही तक्रार देण्यासाठी नांदुरा येथेच जाण्याचे फरमावले! शेवटी गरीबाचे कुणी वाली नसतो हेच खरे !

# अयोध्येतील श्रीराममंदिर प्रतिष्ठापनेचा वर्धापनदिन सोहळा तिथिप्रमाणे ११ जानेवारीला साजरा करावा

**खामगाव (का.प्र.) -** करोडो तास लाखो दिवस असंख्य महिने जवळपास ७६ लढाया,लाखो हिंदूच्या बलिदानानंतर आणि ४९६ वर्षाच्या संघर्षानंतर हिंदू समाजाचा आत्मसन्मान २२ जानेवारी २०२४ ला परत मिळाला. आयोध्येतील प्रभूश्रीराम मंदिरात देशाचे पंतप्रधान मा.नरेंद्रजी मोदी पू.सरसंघचालक मोहनजी भागवत आणि हजारो पूजनीय संतमहंत आणि मान्यवरांच्या उपस्थितीत २२ जानेवारी २०२४ ला बालस्वरूपातील रामललाची प्रतिष्ठापना अयोध्येत झाली. भारतासह संपूर्ण जगात जगात जिथे जिथे हिंदू राहतात त्यांनी हा आनंदोत्सव विविध पद्धतीने साजरा केला.



प्रभू श्रीरामाच्या प्रतिष्ठापना तिथीप्रमाणे ११ जानेवारीला एक वर्ष पूर्ण होत आहे. मागीलवर्षी २२ जानेवारीला असणारी तिथी यावर्षी ११ जानेवारीला आहे. म्हणून शनिवार ११ जानेवारीला वर्धापनदिनी सर्व हिंदू बंधू-भगिनीनी जवळच्या मंदिरात एकत्र येऊन रामनामाचा जप करावा संकीर्तन करावे आणि सामूहिक आरती करुन प्रसाद वितरीत करावा तसेच सायंकाळी घराच्या बाहेर पाच दिवे लावावेत. याशिवाय ज्यांना जे जे शक्य असेल त्यांनी विविध पद्धतीने वर्धापन दिनाचा आनंद साजरा करावा, असे आवाहन विश्व हिंदू परिषद मुंबई क्षेत्रमंत्री गोविंदजी शेंडे आणि मंदिर अर्चक पुरोहित आयामाचे क्षेत्र संपर्कप्रमुख अनिल सांबरे यांनी केले आहे.

# राष्ट्रमाता जिजाऊ जन्मोत्सवानिमित्त विशेष वैद्यकीय सेवा मदत कक्ष आणि आरोग्य शिबिराचे आयोजन

## केंद्रीय आरोग्य राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांची संकल्पना

**बुलडाणा (जिमाका) -** राष्ट्रमाता जिजाऊ जन्मोत्सव सोहळ्यानिमित्त सिंदखेडराजा नगरीत येणाऱ्या जिजाऊ भक्तांच्या आरोग्य सुविधेसाठी केंद्रीय आरोग्य राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांच्या संकल्पनेतून विशेष वैद्यकीय सेवा मदत कक्ष आणि आरोग्य तपासणी व रोगनिदान शिबिराचे आयोजन जिजाऊ विद्यालयामध्ये करण्यात आले आहे.

या शिबिराचे १२ जानेवारीला सकाळी ९ वाजता केंद्रीय आरोग्य राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांच्या हस्ते होणार आहे.

या कार्यक्रमाला कामगारमंत्री आकाश फुंडकर, आमदार मनोज कायदे, माजी आमदार शशिकांत खेडेकर, जिल्हाधिकारी डॉ किरण पाटील, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाबराव खरात, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ भागवत भुसारी, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ अमोल गिते, प्रा. बळीराम मापारी, ऋषीभाऊ जाधव, मायाताई म्हस्के, शेख सिद्धीकी, बाबुराव मोरे, माजी नगराध्यक्ष सतीश तायडे, वैभव देशमुख, बालाजी मेहेत्रे हे उपस्थित राहणार आहेत.

राष्ट्रमाता राजमाता जिजाऊ यांचे जन्मस्थळ असलेल्या सिंदखेडराजा येथील राजे लखुजी जाधव यांच्या राजवाडा येथे जिजाऊ जन्मोत्सवानिमित्त माँ जिजाऊ चरणी नतमस्तक होण्यासाठी राज्यभरातून हजारो भक्त १२ जानेवारीला सिंदखेडराजा नगरीमध्ये येत असतात. आरोग्यसेवा हीच ईश्वरसेवा समजुन भक्तगणांच्या आरोग्य सुविधेसाठी या विशेष वैद्यकीय सेवा मदत कक्ष आणि आरोग्य शिबिराचा आयोजन करण्यात आले आहे.

याशिबिरात अस्थिरोग तज्ञ, कान नाक घसा, मूत्रपिंड व मूत्रमार्ग विकार तज्ञ, कर्करोग तज्ञ, बालरोग तज्ञ, पोटविकार तज्ञ, मानसिक आजार तज्ञ, ह्रदयरोग तज्ञ, मेदु तपासणी आणि नेत्र तपासणी सोबतच मोफत चष्मे आणि औषधीचे वाटप करण्यात येणार आहे. या शिबिरात तज्ञ डॉक्टरांकडून रुग्णांची आरोग्य तपासणी करण्यात येणार आहे. या आरोग्य शिबिराचा गरजू रुग्णांनी लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# एस.टी.बस प्रवासी तपासणी पथक फक्त नावालाच!

**संग्रामपूर (महासागर प्रतिनिधी) -** महाराष्ट्र शासनाने प्रवाश्यांना बस प्रवासात सवलती मिळाव्यात ह्यासाठी विविध योजना अंमलात आणल्या आहेत.परंतु ह्यामध्ये अनेक प्रवासी बोगस डुप्लीकेट आधारकार्डचा वापर करुन ५०टक्के तर ७५ वर्षावरील जेष्ठ नागरिक म्हणून मोफत प्रवासी योजनेचा लाभ घेत आहेत.तर अनेक नागरिक आणि सरकारी कर्मचारी हे दिव्यांगाचे नावाखाली बोगस कार्ड वापरुन ७५ टक्के सवलतीचा लाभ घेत आहेत.त्यामुळे खऱ्या प्रवाश्यांना बसमध्ये त्रास सहन करावा लागतो. व अनेक वेळा भांडणेही होतात. विना प्रवास कोणीही प्रवास करु नये.ह्याबाबीला आळा बसावा म्हणून एस टी बस प्रवासी तपासणी पथक नियुक्त करण्यात आले आहे.परंतु ते फक्त नावालाच असल्याचे दिसून येत आहे. ह्याबाबत आखो देखाहाल माहिती अशी की, आज ९ जानेवारी /२०२५ रोजी शेगाव-जळगाव(जामोद) बस क्र -५३९५ ही साधी बस२६४११९ संध्याकाळी ५.४५ वा शेगाव येथून सुटल्यानंतर अनेक बसथांब्यावर प्रवासी उतरल्यानंतर संग्रामपूर तालुक्यातील वरवट (बकाल) येथे बस थांबताच ४ तपासणी अधिकारी बसजवळ येवून उतरणा-या प्रवाश्यांची तिकीट तपासणी केली,परंतु एकही प्रवासी विनातिकीट नव्हता.परंतु शेगाव येथूनच जवळपास ७० ते ८० चेवर प्रवासी होते.बसमध्ये अनेक प्रवासी हे ७५ वर्षावरील बोगस आधारकार्डधारक जेष्ठ नागरिक होते. तर अनेक प्रवासी हे ६५ वर्षावरील नसतांना बोगस डुप्लीकेट आधार कार्डधारक होते. वरवट (बकाल) येथे काही प्रवासी उतल्यानंतर तिकीट तपासणीचे वेळी त्यांचे आधारकार्ड तपासले नाहीत. व बसमध्ये असणाऱ्या एकाही प्रवाश्याचे तिकीट व आधारकार्ड तपासले नाही. त्यांचेवर दंडात्मक कारवाई करुन आधारकार्ड जप्त केले नाही. त्यामुळे सदर नियुक्त केलेले तपासणी पथक हे फक्त नावापुरतेच आहे काय? असा सवाल निर्माण होतो. जिल्ह्यात सदर तिकीट तपासणी पथकावर शासनाचा त्यांचेसाठी स्पेशल गाडी,टीए,डीए.ह्यावर किती खर्च होतो.

ह्याचा विचार करुन परिवहन मंत्री महोदय,व संबंधित वरीष्ठ अधिका-यांनी लक्ष देवून अश्या पथकास जाब विचारुन यापुढे तरी सर्रास बोगस,डुप्लीकेट आधारकार्ड धारक प्रवाश्यांवर दंडात्मक कारवाई करुन त्यांचे आधारकार्ड जप्त करावे.जेणे करुन बोगस आधारकार्डवर मोफत प्रवास करणारे व ६५वर्षावरील बोगस आधारकार्डधारक सवलती घेणाऱ्यांवर आळा बसेल.आणि बसमध्ये गर्दी कमी होवून वाहकांना आणि विशेषतः ख-या प्रवासकरणा-यांना त्रास होणार नाही. ह्याची म.रा.परिवहन मंडळाने दखल घ्यावी.अशी प्रवाश्यांची कित्येक महिन्यापासून मागणी आहे.

# महसूल कर्मचाऱ्यांना टिप्परखाली चिरडण्याच्या धमक्या देत टिप्पर घेऊन चालक पसार

**नांदुरा (महासागर प्रतिनिधी)** अवैधरित्या गौण खनिज वाहतूक करणाऱ्या वाहनांवर कार्यवाही करण्या करीता महसूल कर्मचारी पेट्रोलींग करीत असतांना ताब्यात घेतलेले अवैध वाळुचे टिप्पर कारवाई साठी तहसील कार्यालयात नेत असताना टिप्पर चालकाने कर्मचाऱ्यांना शिवीगाळ करीत त्यांना टिप्परखाली चिरडण्याच्या धमक्या देत टिप्पर घेऊन पोबारा केल्याची खळबळजनक घटना गुरुवारी ९ जानेवारी रोजी दुपारी ४ वाजता तहसील कार्यालया पासून हाकेच्या अंतरावर असलेल्या पशुवैद्यकीय दवाखान्या समोर घडली. या प्रकारानंतर तलाठ्यांनी थेट नांदुरा पोलिस ठाण्यात धाव घेऊन सदर घटनेची फिर्याद दाखल केली. त्यांच्या फीर्यादी वरुन नांदुरा पोलिसांनी टिप्पर चालक व त्याचा नदिम नावाचा सहकारी अशा दोघा वाळू माफीयांविरोधात गुन्हे दाखल केले. नांदुरा शहर व तालुक्यात गत काही महिन्यांपासून वाळू तस्करीला मोठ्या प्रमाणात उत आला आहे. वाळू तस्करीला चाप लावण्यासाठी तहसीलदार यांनी त्यांच्या कर्मचाऱ्यांना कारवाईचे आदेश दिल्यानंतर काही तलाठी गुरुवारी ९ जानेवारी रोजी दुपारी अवैधरित्या गौण खनिज वाहतूक करणाऱ्या वाहनांवर कार्यवाही करण्यासाठी पेट्रोलींग करीत असतांना त्यांना पशुवैद्यकीय दवाखान्या समोर एक निळ्या रंगाचे अशोक लेलँन्ड कंपनीचे टिप्पर क्र.२८- -७३८४ येताना दिसले. यावेळी सदर टिप्पर थांबवून चौकशी केली असता टिप्पर मध्ये असलेली वाळू चालकाने चोरुन आणल्याचे उघडकीस आल्याने कर्मचाऱ्यांनी चालकास वाहन तहसील कार्यालयात लावण्यास सांगितले असता तेथे टिप्पर चालकाचा सहकारी आला व त्याने वाहन चालकाला खाली उतरवून स्वतः स्टेरींगवर बसुन कॅबीनमधुन कर्मचाऱ्यास खाली उतरवून दिले. तसेच कर्मचारी शासकीय कर्तव्य बजावीत असताना त्यांना शिवीगाळ करीत त्यांना टिप्परखाली चिरडून जिवे मारण्याचा धमक्या देऊन टिप्पर घेऊन नदिमने पळ काढला. सदर प्रकार सुरू असताना तेथे लोकांचा जमाव जमला. सदर घटना ही तहसील कार्यालयापासून हाकेच्या अंतरावर घडल्याने महसूल विभाग वाळू माफीयांसमोर किती हतबल झाला हे स्पष्ट झाले. या घटनेनंतर महसूल कर्मचाऱ्यांनी नांदुरा पोलिस ठाण्यात फिर्याद दाखल केली. तलाठी नितीन भास्करराव म्हस्के वय ४० यांच्या फीर्यादी वरुन नांदुरा पोलिसांनी आरोपी टिप्परचा चालक व त्याचा सहकारी नदिम या दोघांविरोधात कलम १३२ , २२१ , ३०३(२) , ३५२ , ३५१ (२),(३), ३, (५) बि एन एस एस सह कलम गौण खनिज अधिनियम १९५७ चे कलम २१(१) , २१(२) सह कलम मोवाका अन्वये गुन्हे दाखल केले आहेत.


# नगर परिषद कार्यालय शेगाव, जि.बुलढाणा

क्रमांक/नपाशे/नाउजिअ/५६/२०२५

## जाहीर प्रगटन

दिनांक १०/१/२०२५

(उपजिवीका संरक्षण व पथ विक्री विनीयमन) अधिनियम २०१४ च्या कलम ११ (४), १२ व १३ अन्वये पात्र सदस्यांची नावे मागविण्यांत येत आहेत. तसेच अधिसुचना नगर परिषदेच्या संकेतस्थळावर प्रसिध्दी करण्यांत येत आहे.

| अ. क्र | प्रवर्ग | सदस्य संख्या | अर्ज सादर करण्याची शेवटची दिनांक |
|---|---|---|---|
| १ | अशासकीय संघटना | ०१ | प्रसिध्दीच्या दिनांकापासून १५ दिवसाच्या आत अर्ज सादर करावा |
| २ | समुदाय आधारीत संघटना | ०१ | प्रसिध्दीच्या दिनांकापासून १५ दिवसाच्या आत अर्ज सादर करावा |
| ३ | निवासी कल्याण संघ | ०२ | प्रसिध्दीच्या दिनांकापासून १५ दिवसाच्या आत अर्ज सादर करावा |

वरील प्रमाणे सदस्य पदासाठी संबधीत संघटनेच्या सदस्य जे खालील प्रमाणे पात्रता धारण करीत असतील त्यांनी नगर परिषदेमध्ये अर्ज सादर करावेत. -

१) संघटनेच्या किंवा संघाची नियम ११ च्या उपनियम ४ मध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे क्षेत्रातील सक्षम प्राधिकरणाकडे नोंदणी केलेली असावी.
२) संघटनाची किंवा संघ मागील ३ वर्षाचे सक्षम प्राधिकरणा कडुन तयार करण्यांत आलेले लेखापरिक्षा अहवाल सादर करील.
३) संघटना किंवा संघास स्थानिक प्राधिकरणाने काळया यादीत टाकलेले नसावे यासाठी १०० रु.स्टॅम्प पेपरवर नोटरी करुन पथपत्र सादर करावे.
४) संघटना किंवा संघ त्या-त्या वेळी अमलात असलेल्या कोणत्याही कायदयाने सिध्द दोष असणार नाही.
५) संघटना किंवा संघ यांना त्यांनी सक्षम प्राधिकरणाकडे नोंदणी केलचे त्याच्या प्रवर्ग मधील कामाचा किमान ५ (पाच) वर्षाचा अनुभवा असावा. ६) नगर परिषदेचा थकबाकीदार नसावा.

( डॉ.जयश्री काटकर-बोराडे)
मुख्याधिकारी तथा प्रशासक नगर परिषद, शेगाव

